**महसूल विभागामार्फत जनतेला दिले जाणारे विविध प्रकारचे दाखले व विविध प्रकारच्या सेवांसाठी Governance Process Re-engineering (GPR) संकल्पनेचा वापर करून सुलभता आणणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२४६/ ई-१६२७४६२ /भूमापन**
मंत्रालय, मुंबई-४०००३२.
दिनांक :- २० एप्रिल, २०२६

**संदर्भ**:- (१) मा.मुख्यमंत्री सचिववालयाचे अ.शा.पत्र क्र.मुमंस/ जीपीआर/ १४८, दि.२३.३.२०२६
(२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२६/प्र.क्र.२४/आस्था-१ अ, दि.३०.३.२०२६

**प्रस्तावना:-**

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.३०.३.२०२६ अन्वये महसूल विभागामार्फत जनतेला दिले जाणारे विविध प्रकारचे दाखले व विविध प्रकारच्या सेवांसाठी Governance Process Re-engineering (GPR ) संकल्पनेचा वापर करून सुलभता आणणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे. तसेच, (१) शपथपत्राचा नमूना (General Affidavit) (२) वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र (Age, Nationality and Domicile Certificate) (३) रहिवास प्रमाणपत्र (Residence Certificate) (४) उत्पन्न प्रमाणपत्र (१ वर्षासाठी/३ वर्षांसाठी) (income Certificate) (५) भूमिहीन शेतमजूर प्रमाणपत्र (Bhoomiheen Certificate) आणि (६) अल्प भूधारक प्रमाणपत्र (Alpabhudharak Certificate) या सेवांसाठी द्यावयाच्या दाखल्यांकरिता राज्यातील सर्व जिल्ह्यात सुधारित नमुन्यात (Unique Format) देण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. तथापि, प्रमाणपत्रांच्या नमुन्यात सुधारणा करण्यात आलेली बाब क्षेत्रिय शासकीय कार्यालयांस अवगत नसल्याने नागरिकांना शासकीय लाभांपासून वंचित राहावे लागत असल्याची समस्या उपस्थित झाली आहे. यास्तव, सर्व मंत्रालयीन विभागांना मार्गदर्शक सूचना निर्गमित करणे आवश्यक झाले आहे.

**शासन परिपत्रक** :-

महसूल व वन विभाग, शासन निर्णय, दि.३०.३.२०२६ अन्वये महसूल विभागामार्फत जनतेला दिले जाणारे विविध प्रकारचे दाखले व विविध प्रकारच्या सेवांसाठी Governance Process Re-engineering (GPR ) संकल्पनेचा वापर करून सुलभता आणणेबाबत निर्णय घेण्यात आलेला आहे.

सदर शासन निर्णयान्वये शासनाच्या विविध योजना व सेवांच्या प्रक्रियेचे सुलभीकरण Governance Process Re-engineering (GPR) अंतर्गत करण्यात आले आहे. शासनाने अधिसूचित केलेल्या सेवांसाठी लागणाऱ्या घटकांची संख्या कमी करण्यात आली. तसेच नागरीकांसाठी प्रक्रियेचे सुलभीकरण करण्यात आले आहे. त्यासाठी आवश्यक असलेले अर्ज, आवश्यक कागदपत्रे, मंजूरीचे स्तर व अंतिम सेवेच्या मान्यतेचे दाखले / प्रमाणपत्र यात करावयाचे अनुषंगिक बदल करण्याच्या अनुषंगाने शासनाने अधिसूचित केलेल्या (१) शपथपत्राचा नमूना (General Affidavit) (२) वय, राष्ट्रीयत्व आणि अधिवास प्रमाणपत्र (Age, Nationality and Domicile Certificate) (३) रहिवास प्रमाणपत्र (Residence Certificate) (४) उत्पन्न प्रमाणपत्र (१ वर्षासाठी/३ वर्षांसाठी) (income Certificate) (५) भूमिहीन शेतमजूर प्रमाणपत्र (Bhoomiheen Certificate) आणि (६) अल्प भूधारक प्रमाणपत्र (Alpabhudharak Certificate) या सेवांसाठी आवश्यक असलेल्या अर्जातील बदल "आपले सरकार" पोर्टलवर उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

२. दि.३०.३.२०२६ च्या शासन निर्णयान्वये उपरोक्त दाखले राज्यातील सर्व जिल्ह्यांत सुधारीत नमुन्यात (Unique Format) देण्याचा निर्णय शासनाने घेतला असल्याने वरील सेवा / दाखले यासाठी करावे लागणारे अर्ज, प्रतिज्ञापत्र, निर्गमित करावयाचे दाखले व त्यासाठी आवश्यक असणारे कागदपत्रे "आपले सरकार" पोर्टलवर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.

३. तथापि, प्रमाणपत्रांच्या नमुन्यात सुधारणा करण्यात आलेली बाब विविध प्रशासकीय विभागांच्या क्षेत्रिय शासकीय कार्यालयांस अवगत नसल्याने नव्या स्वरूपातील प्रमाणपत्रे काही ठिकाणी स्वीकारण्यात येत नाहीत. त्यामुळे सामान्य नागरिकांना शासकीय लाभापासून वंचित रहावे लागत आहे. त्याकरिता सर्व सक्षम प्राधिकारी व मंत्रालयीन विभाग यांच्या माहितीकरिता सदर सुधारित स्वरूपातील प्रमाणपत्रांचे विहित करण्यात आलेले नमुने सोबत जोडले आहेत. यास्तव, सर्व मंत्रालयीन विभागांना सूचना देण्यात येतात की, सर्व मंत्रालयीन विभागांनी त्यांच्या अधिपत्याखालील सर्व क्षेत्रिय कार्यालयांना प्रमाणपत्राच्या मसुद्यात सुधारणा करण्यात आल्याची बाब तात्काळ अवगत करून देण्यात यावी. तसेच, सदर सुधारित नमुन्यामध्ये सक्षम प्राधिकारी यांनी निर्गमित केलेली प्रमाणपत्रे आवश्यक तेथे सर्व शासकीय कामकाजाकरिता ग्राह्य धरण्यात यावीत याबाबतच्या सूचना देण्यात याव्यात. तसेच, प्रमाणपत्रांच्या सुधारित नमुन्यानुसार आवश्यकतेनुसार त्या त्या विभागाच्या संगणकीय प्रणालीमध्येही आवश्यक त्या सुधारणा/ बदल तात्काळ करण्याबाबत सूचना देण्यात याव्यात.

४.	सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०४२०१२४०५०५९१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांचे आदेशानुसार व नावाने,

SANJAY RAGHUNATH BANKAR

Digitally signed by SANJAY RAGHUNATH BANKAR
DN: CN = SANJAY RAGHUNATH BANKAR, C = IN, S = Maharashtra, O = GOVERNMENT OF MAHARASHTRA, OU = REVENUE AND FOREST DEPARTMENT
Date: 2026.04.20 12:43:22 +05'30'

**(संजय बनकर)**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा.राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव
३) मा.उपमुख्यमंत्री (नगर विकास/गृहनर्माण) यांचे सचिव
४) मा.उपमुख्यमंत्री (राज्य उत्पादन शुल्क, क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ) यांचे सचिव
५) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
६) मा.राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
७) सर्व विधानपरिषद/ विधानसभा सदस्य, महाराष्ट्र राज्य
८) सर्व मा.मंत्री/ राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
९) मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
१०) अपर मुख्य सचिव (महसूल), महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे स्वीय सहाय्यक.
११) सर्व मंत्रालयीन विभाग, मंत्रालय, मुंबई
१२) सर्व विभागीय आयुक्त
१३) सर्व जिल्हाधिकारी
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता / लेखा परीक्षा) महाराष्ट्र १/२, मुंबई/ नागपूर
१५) निवडनस्ती (कार्यासन भूमापन) महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई.

# कार्यकारी दंडाधिकारी यांचे समक्ष

**Photo of beneficiary**

जा.क्रमांक :

दिनांक :

अर्जदाराचे नाव :

वय :

व्यवसाय :

पत्ता :

ज्या कारणाकरीता शपथपत्र आवश्यक आहे ते कारण नमूद करावे.

**________________बाबत पतिज्ञापत्र**

(प्रतिज्ञापत्राचा तपशील)

मी शपथ घेऊन घोषित करतो की या अर्जात मी दिलेली माहिती बरोबर आहे आणि मला माहिती आहे की जर नंतर ती चुकीची आढळली तर माझ्यावर भारतीय न्याय संहितेचे कलम २२९, २३६ आणि २३७ च्या तरतुदींनुसार खटला चालवला जाईल आणि त्यानुसार मला शिक्षा केली जाईल

वरील माहिती माझ्या माहितीनुसार खरी आणि बरोबर आहे. म्हणून हे प्रतिज्ञापत्र सादर केले जात आहे.

स्थळ:

दिनांक :

मी अर्जदाराचे नाव याव्दारे घोषित करतो कि वरील माहिती माझ्या माहितीनुसार, खरी आणि बरोबर आहे. जर वर दिलेली माहिती खोटी असल्याचे आढळले तर, मी भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलाम २३६,२३७,२२९ (२) आणि / किंवा त्यासंबंधित इतर कोणत्याही काद्यानुसार खटला भरला जाण्यास आणि शिक्षेस पात्र असेन.

स्थळ :

दिनांक :

प्रतिज्ञापत्र धारकाची सही

अर्जदाराचे नाव यांनी सही करून शपथपूर्वक सादर केले असून त्यांच्या ओळखीची पडताळणी OTP-आधारित आधार प्रमाणीकरणाव्दारे करण्यात आली आहे.

सक्षम प्राधिकारी

सत्यमेव जयते

# Government of Maharashtra

**Tahsil Office,……… District.............**

Outward No. : ……………
Date : …………....

| |
|---|
| Photo<br>Of<br>Beneficiary |

## Certificate of Age, Nationality and Domicile

It is hereby certified that, Shri/Shrimati…………………… Village/Town/City ………………, Taluka…………..,District ………. was born on ……………………… at.............., Taluka …………….., District ……………….in the State of Maharashtra within the territory of India and is a Citizen of India and has domiciled in the State of Maharashtra.

Place : …………….
Date : …………….

SEAL OF OFFICE

Name, Signature and Designation

120521122740028427 14

Ref 1: G.R.P.& S.D. No.1586/34-D, Dated 17th May,1951
Ref 2: G.R.GAD No. Mis 31/76-Desk-xxxll, Dated 25th August.1977
Ref 3: भा.नि.मा.प्र.वि.क. डीएममी 1087/9698/608-32. Dated 2nd January, 1989
Ref 4: Government Resolution No. Mis.2010/PRA.KRA.300/Videshi-2 Mantralaya, Mumbai-32. Dated 5th October,2010

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

तहसील कार्यालय ..................जिल्हा..............

Photo

of

beneficiary

जा. क्रमाक : .................
दिनांक : ................

## रहिवास प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती ........................ हे राहणार मौजे (गाव / शहर) ...................... तालुका ................ जिल्हा ..................... येथील रहिवासी आहेत.

स्थळ : - ..................

दिनांक : .....................

SEAL OF
OFFICE

स्वाक्षरी, नाम व पदनाम

128521122749028427 14

पडताळणीसाठी - https://www.mahaonline.gov.in/Verify येथे भेट द्या ...

# महाराष्ट्र शासन

तहसील कार्यालय .................जिल्हा.............

Photo

Of

Beneficiary

क्रमांक : ........................

दिनांक : ........................

## उत्पन्न प्रमाणपत्र
## (१ वर्षासाठी)

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ....................................................राहणार. ............................. तालुका ................... जिल्हा........................ येथील अर्जदार आहेत. त्यांचे तलाठी अहवालानुसार व त्यांनी पुरविलेल्या माहिती / कागदपत्रानुसार त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे, सर्व मार्गांनी मिळालेले **एक वर्षाचे उत्पन्न** खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | वार्षिक उत्पन्न (रु.) | अक्षरी (रु.) |
|---|---|---|
| २०२४-२०२५ | .......... | .............. |

सदरचा दाखला श्री./श्रीमती......................................................... यांना ................................ कारणासाठी / कामासाठी देण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र दि.३१ मार्च .............. पर्यंत वैध राहील.

स्थळ : ..................

दिनांक : ....................

SEAL OF
OFFICE

स्वाक्षरी, नाम व पदनाम

तहसीलदार

12652112274002842714

# महाराष्ट्र शासन

तहसील कार्यालय .................जिल्हा.............

Photo

Of

Beneficiary

क्रमांक : ........................

दिनांक : ........................

## उत्पन्न प्रमाणपत्र
## (३ वर्षांसाठी)

प्रमाणित करण्यात येते की, श्री./श्रीमती ....................................................राहणार. ............................. तालुका ................... जिल्हा........................ येथील अर्जदार आहेत. त्यांचे तलाठी अहवालानुसार व त्यांनी पुरविलेल्या माहिती / कागदपत्रानुसार त्यांच्या कुटुंबातील सर्व सदस्यांचे, सर्व मार्गांनी मिळालेले **तीन वर्षाचे उत्पन्न** खालील प्रमाणे आहे.

| वर्ष | वार्षिक उत्पन्न (रु.) | अक्षरी (रु.) |
|---|---|---|
| २०२२-२०२३ | ........... | ............... |
| २०२३-२०२४ | ........... | ............... |
| २०२४-२०२५ | ........... | ............... |

सदरचा दाखला श्री./श्रीमती......................................................... यांना ................................ कारणासाठी / कामासाठी देण्यात येत आहे.

हे प्रमाणपत्र दि.३१ मार्च .............. पर्यंत वैध राहील.

स्थळ : ..................

दिनांक : ....................

SEAL OF OFFICE

स्वाक्षरी, नाम व पदनाम

तहसीलदार

12052112274002842714

माहिती तंत्रज्ञान (मातं) अधिनियम, 2000 नुसार डिजीटल स्वाक्षरी असणारा हा दस्तऐवज कायदेशीररित्या वैध आहे.
पडताळणीसाठी - https://www.mahaonline.gov.in/Verify येथे भेट द्या .

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

तहसील कार्यालय ..................जिल्हा..............

| Photo Of Beneficiary |
|---|

जा. क्रमाक : .................
दिनांक : ...............

## भूमिहीन शेतमजूर प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती ................................. राहणार ............................................. तालुका..................................जिल्हा..................................येथील रहिवासी आहेत.

श्री / श्रीमती ................................. यांना मौजे................................ता........................ जि ................ येथे जमीन नाही.

त्यांचे नावे मौजे ........... येथे जमीन नसल्यामुळे ते भूमिहीन असून त्यांचा मुख्य व्यवसाय शेतमजुरी आहे.

टीप :- हे प्रमाणपत्र फक्त .................................. गावाच्या हद्दीपर्यंत वैध राहील.

स्थळ : - ..................

दिनांक : ....................

SEAL OF OFFICE

स्वाक्षरी, नाम व पदनाम

12852112274002842714

पडताळणीसाठी - https://www.mahaonline.gov.in/Verify येथे भेट द्या ...

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

तहसील कार्यालय .....................

जा. क्रमाक : ................
दिनांक : ...............

| |
|---|
| Photo<br><br>of<br><br>beneficiary |

## अल्पभूधारक प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री / श्रीमती ......................., राहणार मौजे..................... तालुका ................ जिल्हा .................... यांचे नावे मौजे......................ता. ....................जि................. येथे भूमापन क्रमांक.......... क्षेत्र .......हे. आर. जमीन असून अर्जदार अल्पभूधारक आहेत.

स्थळ : - ..................

दिनांक : ....................

SEAL OF
OFFICE

स्वाक्षरी, नाम व पदनाम
तहसीलदार

12852112274002842714

पडताळणीसाठी - https://www.mahaonline.gov.in/Verify येथे भेट द्या ...